# व्यसनमुक्तीचा फटका

व्यसनामधी गुरफटल्या मित्रा कधीच आशा सोडू नको
मुक्त होशी तु दारु नशेच्या उपचारा तु विसरु नको

नशेत घाडल्या भीषण घटना उगाच आठवीत बसू नको
झाले गेले विसरुन जा तु भविष्य चिंता करु नको

फक्त आज तु दुर रहा या घातक घोटापासून रे
मिळेल सारे गमावलेले मित्रमैत्र अन कुटुंब रे

तब्येतीची नको काळजी भरुन सगळे येईल रे
हेळसांड थांबव शरीराची लक्ष दे आता स्वतकडे:

व्यसन लागण्यापूर्वी होता गुणी हुशार अन जबाबदार
दारु वजा कर होशिल नेटका पूर्वीसारखा हिंमतबाज

टीबी डैबिटीस टाईफाईड अन निमोनिया हे रोग जसे
व्यसन हाही एक रोग असुनी तुला मदतीची गरज असे

उघडू शकतो बुच बाटलीचे परंतु लावु शकत नसे
नशेत असतो काय करीतसे नंतर त्याची स्मृती नसे

वाट कशाची आता पाहसी उपचाराला हो तय्यार
मुक्तांगणचे मित्र उभे रे झटपट द्याया तुला आधार

इथे नाही रे कुणी आरोपी जाब नाही कुणी विचारणार
मुक्तांगण हा तुरूंग नाही इथे शॉक नाही मिळणार

आनंदाने निरोप घेशी सांग कुटुंबा मी निघतो
व्यसनाचा भुतकाळ गाडण्या मुक्तांगणला मी जातो

\- अनिल अवचट